CREDAI-MCHI

**<u>प्रदर्शनाची एक झलक</u>**

**गृहखरेदीचा उत्सव, साजरा करा क्रेडाई-एमसीएचआय 'महा प्रॉपर्टी एक्स्पो २०१७'सह**

**'क्रेडाई-एमसीएचआय महा प्रॉपर्टी एक्स्पो २०१७'मुळे यंदाच्या मोसमाला उत्सवी स्वरूप!**

## रेरानंतरचे भारतातील पहिले आणि सर्वात मोठे प्रदर्शन

रेरानंतर भारतातील पहिलेच आणि भव्य प्रॉपर्टी प्रदर्शन मुंबईतील बीकेसी येथील एमएमआरडीए ग्राऊंडवर आजपासूनच म्हणजे १६ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. या चार दिवसीय प्रदर्शनाला भेट न देणे तुम्हाला परवडण्यासारखे नाहीच. कारण, या प्रदर्शनात विविध प्रकारच्या प्रॉपर्टी आणि गृहकर्जाचे पर्याय ग्राहकांच्या स्वागतासाठी सज्ज आहेत. या प्रदर्शनात ग्राहकांसाठी मुंबईतील उत्तमोत्तम प्रॉपर्टी उपलब्ध असतील, त्याही आकर्षक सवलतींसह.

गेली काही वर्षे अतिशय खडतर गेल्यानंतर आता रिअल इस्टेट क्षेत्राचे चित्र आशादायक झाले आहे, हे तुम्हाला माहीतच असेल. राज्य सरकारने **'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' (ईओडीबी)**च्या अमलबजावणीचे लक्षणीय पाऊल उचलले आणि त्यामुळे भारत जागतिक बँकेच्या आकडेवारीत १३० व्या स्थानावरून १०० व्या स्थानावर पोहोचल्याने हे शक्य झाले आहे. **सन्माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी** यांची दूरदृष्टी, **सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस** यांचे अतुलनीय नेतृत्व आणि **बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त आयएएस श्री. अजोय मेहता** यांची परिणामकारक अमलबजावणी यामुळे हे मानाचे स्थान मिळवणे शक्य झाले आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रावर मोठा परिणाम करणारे केंद्र सरकारचे निर्णय म्हणजे रेरा आणि जीएसटी. रेरा आणि जीएसटीसज्ज होण्यासाठी या क्षेत्राने सर्वतोपरी प्रयत्न केले. सध्या रिअल इस्टेट क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी उभारी देण्याच्या तयारीत आहे. अशा या अगदी सुयोग्य वेळी हे प्रदर्शन भरविण्यात येत जात आहे. रेरा रजिस्ट्रेशन, ईओडीबीमधील रेअर (आरएआरई) वैशिष्ट्य, परवडणाऱ्या घरांसाठी सरकारचे प्रयत्न, ग्राहकाचा वाढलेला आत्मविश्वास, उत्सवी खरेदीतील वाढ आणि व्याजदरातील सुलभता ही परिस्थिती अत्यंत अनुकूल झालेली आहे.

१५ वर्षे आणि २७ पर्वांनंतर **३० लाखांहून अधिक** ग्राहकांना घरे मिळवून देणारे हे १०,००० चौ. मी. जागेत विस्तारलेले प्रदर्शन पुन्हा एकदा, यावर्षी ग्राहकांसाठी रेरा नोंदणी असलेले आणि सर्व प्रकारच्या आर्थिक गणितांना साजेसे, महत्त्वाचे प्रकल्प घेऊन येत आहे. 'परवडणाऱ्या दरातील घरां'वर विशेष भर देण्यात आला आहे. या विभागात ग्राहकांना प्रदर्शनातील अनेक मालमत्तांमधून निवड करता येईल. 'सर्वांसाठी घरे' या सन्माननीय पंतप्रधानांच्या दूरदृष्टीशी समरूपता साधणे, हे या प्रदर्शनाचे उद्दिष्ट आहे.

**प्रदर्शनाची ठळक वैशिष्ट्ये** : एक लाख संभाव्य ग्राहक, प्रयोगात्मक स्टॉल डिझाइन, लकी ड्रॉच्या संधी, ४ दिवसांचा उत्सव, १० लाखांपासून १० कोटींपर्यंतच्या मालमत्ता, मालमत्तेच्या खरेदी आणि विक्रीसाठी डिजिटल पर्याय आणि खास ऑफर्स.

**प्रदर्शनातील रिअल-इस्टेट सहभागी** : एल ॲण्ड टी रिॲल्टी, गोदरेज प्रॉपर्टीज, ओमकार, कल्पतरू, रेडिअस डेव्हलपर्स, शिवालिक व्हेंचर्स, कनाकिया स्पेसेस, अजमेरा रिॲल्टी, मॅरेथॉन रिॲल्टी, रुस्तमजी, एकता वर्ल्ड, वीणा डेव्हलपर्स, रोमेल ग्रूप, मेफेअर हाउसिंग, वाधवा ग्रूप इत्यादी.

**प्रदर्शनातील बँका आणि एचएफसी सहभागी** : स्टेट बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, युको बँक, पीएनबी, सिंडिकेट बँक आणि पीएनबी हाउसिंग, एलआयसी हाउसिंग, इंडिया बुल्स, टाटा कॅपिटल आणि आदित्य बिर्ला फायनान्स या एचएफसी सहभागी होणार आहेत.

मर्यादित कालावधीच्या ऑफर्सने भरलेल्या या प्रॉपर्टी एक्स्पोला भेट देऊन गृह खरेदीदारांनी अधिकाधिक संधीचा लाभ घ्यायला हवा. यामुळे, त्यांना बचत करणेही शक्य होईल.

क्रेडाई-एमसीएचआय महा प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये आणखी एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे बिझनेट-ग्राहक आणि या क्षेत्रातील संबंधित कंपन्यांना परिपूर्ण असा, '३६० अंशा'चा अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आलेले एक अप्रतिम व्यवसाय आणि संपर्क (बिझनेस ॲण्ड नेटवर्किंग) व्यासपीठ. या खास वैशिष्ट्यामुळे या क्षेत्रातील संबंधित कंपन्यांना प्रदर्शनाच्या गजबजाटी परिसरात महत्त्वाच्या विकासकांशी समोरासमोर संवाद साधता येणार आहे.

क्रेडाई-एमसीएचआयने 'विमेन्स विंग'च्या माध्यमातून सीएसआरअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि बांधकाम कामगारांसाठी आरोग्यसुविधा असे काही महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. विमेन्स विंगने हे कार्य आणखी पुढे नेत प्रदर्शनाच्या ठिकाणी अपोलो हॉस्पिटलच्या साहयाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

**क्रेडाई-एमसीएचआयचे अध्यक्ष श्री. मयुर शहा** म्हणाले, "महारेरानंतर भरणारे २८वे महा प्रॉपर्टी एक्स्पो हे या क्षेत्रातील पहिलेच प्रदर्शन आहे. यात गृह खरेदीदारांसाठी रेरा नोंदणी असलेल्या मालमत्तांसोबतच काही उत्तम वित्तपर्याय आकर्षक पद्धतीने मांडलेले असतील, तेही एकाच छताखाली. यामुळे ग्राहकांना प्रदर्शनातून मालमत्ता खरेदी करण्याबद्दल विश्वास वाटू लागेल. ग्राहकांच्या आनंदी भावनांशी सांगड घालत महा प्रॉपर्टी एक्स्पो सध्याच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरेल, असा आम्हाला विश्वास आहे. त्यामुळे ग्राहकांनाही अगदी आमच्यासारखे- 'एमसीएचआय है तो भरोसा है' असे वाटतेय, यात नवल नाही."

**एक्झिबिशन कमिटीचे अध्यक्ष श्री. तेजस व्यास** म्हणाले, "महा प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये एकाच छताखाली सर्व प्रकारच्या वित्तीय गणितांना आणि आवडीनिवडींना साजेशी- आलिशान ते

परवडणारी, व्यावसायिक ते निवासी अशी सर्व प्रकारची रेरा नोंदणी मालमत्ता उपलब्ध असल्याने हे गृहखरेदीदारांसाठी 'वन-स्टॉप-शॉप' ठरणार आहे. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या पाहुण्यांना आणि मालमत्ता घेऊ इच्छिणाऱ्यांना अविस्मरणीय अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. आता रिअल- इस्टेट क्षेत्र त्याच्या ग्राहकांच्या गरजांनुरुप सज्ज झाल्याने भारताच्या व्यावसायिक आणि सामाजिक परिसंस्थेतही या क्षेत्राने प्रचंड ऊर्जा निर्माण केली आहे. सरकारने पुरेशा प्रमाणात चालना दिल्याने पुढील काळात परवडणाऱ्या दरातील घरांसाठीची मागणी वाढणार आहे आणि आम्ही विकासकही या संधीसोबत पुढे जाण्यास सज्ज होत आहोत- जिथे प्रत्येक मुंबईकराकडे 'घर' असेल."

गृहखरेदीदारांसाठी इथे बरेच काही आहे.

**क्रेडाई-एमसीएचआयबद्दल**

एमसीएचआयची स्थापना १९८२ साली झाली असून ती मुंबई आणि एमएमआरमधील अत्यंत महत्त्वाची आणि मान्यताप्राप्त संस्था आहे. क्रेडाई-एमसीएचआयकडून रिअल इस्टेट विकास क्षेत्रातील सदस्यांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणले जात असून त्यातून उद्योगासमोर असलेल्या विविध समस्यांचा विचार केला जात आहे. मुंबईमध्ये १८०० पेक्षा अधिक आघाडीच्या विकासकांच्या सदस्यत्वासह क्रेडाई-एमसीएचआयने आपला विस्तार एमएमआरमध्ये केला आहे. त्यांची युनिट्स ठाणे, कल्याण- डोंबिवली, मिरा- विरार शहर, रायगड आणि नवी मुंबई येथे आहेत. क्रेडाई-एमसीएचआयचे सदस्य मुंबई आणि एमएमआरमधील नवीन निवासी आणि वाणिज्यिक मालमत्तांच्या ८० टक्के संघटित विकासासाठी जबाबदार आहेत.

**For further details:**

**RSVP**

**Bienu Vaghela: 9167141962**

**Bhagyashree Khedkar: 9833189357**